ePaper

## स्वातंत्र्यवीर सावरकर बदनामी प्रकरणात राहुल गांधींना जामीन!



|| वर्ष - 8 | अंक -182 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 11 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- आकाश दीपने काय चूक केली?
- अफगाणिस्तानच्या सामन्यावर बहिष्कार
- देशातील गावावर एअर स्ट्राइक
- बांगलादेश-तुर्कियेमध्ये करार


## राष्ट्रवादीची बडी मुन्नी कोण ?

# सुरेश धस यांच्यावर अजितदादा भडकले!

### थेट म्हणाले, गोष्टी कोणी बोलत असेल तर मी स्पष्ट नावे घेऊन बोलणार

**| पुणे | महाईन्यूज**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यातील राजकारण तापले आहे. गंभीर आरोप केली जात आहेत. अनेक ठिकाणी मोर्चाचे आयोजन केले जातेय. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यात पहिला मोर्चा हा बीडमध्ये काढला गेला. त्यानंतर सतत मोर्चे निघताना दिसत आहेत. बीडच्या मोर्चात अनेक मोठे नेते दाखल झाले. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडवर संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी खंडणीचा गुन्हा हा दाखल करण्यात आलाय. यासोबतच या हत्येचा मास्टरमाईंट हा कराडच असल्याचे सांगितले जातंय.**



सुरेश धस यांच्याकडून या प्रकरणी गंभीर आरोप केले जात आहेत. अगोदर धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करताना सुरेश धस दिसले. त्यानंतर आता त्यांच्या निशाण्यावर थेट राष्ट्रवादीच असल्याचे बघायला मिळतंय. काही दिवसांपूर्वीच सुरेश धस यांनी अजित पवार यांची भेट घेतल्याने विविध चर्चा या रंगताना दिसल्या. मात्र, आपण वेगळ्या कारणामुळे अजित दादांची भेट घेतल्याचे सुरेश धस यांनी स्पष्ट केले.

**राष्ट्रवादीतील बड्या मुन्नीची सुन्नी करणार; सुरेश धसांचा खळबळजनक दावा, चर्चांना उधाण**

सुरेश धस यांनी म्हटले होते की, राष्ट्रवादीमध्ये मुन्नी आहे. राष्ट्रवादीत एक वरिष्ठ मुन्नी आहे. राष्ट्रवादीत एक बडी मुन्नी आहे आणि त्या मुन्नीला म्हणा तू इथे ये. मिटकरी, सुरज चव्हाण या लहान पोरांना बोलायला लावते. मला माहितीये आणि मुन्नीला माहिती आहे, मी कोणाबद्दल बोलत आहे. सुरेश धसांच्या या विधानानंतर विविध चर्चा रंगताना दिसल्या. आता सुरेश धस यांच्या या मुन्नीच्या विधानावर अजित पवार हे चांगलेच संतापल्याचे बघायला मिळाले.

अजित पवार यांना विचारण्यात आले की, सुरेश धस यांनी बडी मुन्नी म्हणून काही आरोप केले आहेत. त्यावर बोलताना संतापून अजित पवार हे म्हणाले की, ते त्यांना विचारा...हे असल्या फालतू गोष्टी कोणी बोलत असेल तर मी स्पष्ट नावे घेऊन बोलणार आहे. त्याच्यामुळे त्याला विचारा...कोण आहे ते... सुरेश धस यांच्यावर अजित पवार हे संतापलेले दिसले. राष्ट्रवादीमध्ये एक बडी मुन्नी आहे आणि तिने समोर यावे, असे सुरेश धस यांनी म्हटले होते.

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया

संतोष देशमुख हत्याप्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. यावर देखील अजित पवार यांनी उत्तर दिलं आहे. तुमच्याकडे पुरावे असतील तर ते न्यायालयाला द्या, सीआयडीला द्या, एसआयटीला द्या. पण पुरावे नसताना आरोप करणं कितपत योग्य आहे असा सवाल यावेळी अजित पवार यांनी केला आहे. ते म्हणाले की या प्रकरणावर सध्या तीन यंत्रणा काम करत आहेत. एसआयटी नियुक्त करण्यात आली आहे, सीआयडी तपास करत आहे, आणि न्यायालयीन चौकशी देखील सुरू आहे. चौकशीत दोषी आढळल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, जो दोषी असेल त्याला पाठिशी घालणार नाही. दोषींना कडक शिक्षा होईल असंही यावेळी अजित पवार यांनी म्हटलं आहे.

## बारामतीचे कृषिक प्रदर्शन ठरणार आकर्षणाचा केंद्रबिंदू

### शरद पवारांपासून विविध राजकीय पक्षाचे नेते जमणार एकाच व्यासपीठावर

**| बारामती | प्रतिनिधी : महाईन्यूज**

**येत्या १६ ते २० जानेवारी दरम्यान ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषि विज्ञान केंद्रामार्फत आयोजित होणारे कृषिक प्रदर्शन होणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन १५ जानेवारी रोजी संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत होणार आहे. यानिमित्ताने लोकसभेच्या निवडणूकीनंतर भाजप, राष्ट्रवादीच्या दोन्ही गटातील नेते एकत्र येत आहेत. त्यामुळे या प्रदर्शनाची शेती क्षेत्रात व राजकीय पातळीवरही उत्सुकता आहे.**



यासंदर्भात ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. गेल्या दहा वर्षांपासून कृषिक हे भारतातील नव्हे तर जगातील सर्वात मोठे प्रात्यक्षिक आधारित कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षीचे १० वे कृषिक प्रदर्शन दिनांक १६ ते २० जानेवारी, २०२५ दरम्यान होत आहे. हे प्रदर्शन सशुल्क असून यावर्षीचे प्रदर्शन हे कृत्रिम बुध्दीमत्तेच्या संकल्पनेवर आधारलेले आहे.

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषि विज्ञान केंद्र, बारामती मार्फत गेल्या दहा वर्षांपासून कृषिक हे भारतातील नव्हे तर जगातील सर्वात मोठे प्रात्यक्षिक आधारित कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षीचे १० वे कृषिक प्रदर्शन दिनांक १६ ते २० जानेवारी, २०२५ दरम्यान होत आहे. थेट प्रात्यक्षिकावर आधारीत कृषी प्रदर्शनाचे हे १० वे वर्ष असून दरवर्षी देशभरातून साधारण अडीच ते तीन लाख शेतकरी भेट देतात. तब्बल १७० एकर प्रक्षेत्रावर या

### विविध AI, सेन्सर व रोबोटिक तंत्रज्ञान

या वर्षी नेदरलँड, चीन, अमेरिका, इस्त्राइल, ब्राझिल, स्पेन, इटली, जर्मनी, अफ्रिका, फ्रान्स, थायलंड, कोरीया, जपान, इंग्लंड (UK), मेक्सीको, स्विडेन, तुर्कस्थान, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांतील विविध AI, सेन्सर व रोबोटिक तंत्रज्ञान बियाणे, खते, औषधे, मशिनरी, पॉलीहाउस, लागवड तंत्रज्ञान, स्मार्ट टुल्स पाहण्याची नामी संधी उपलब्ध होणार आहे. या देशातील तंत्रज्ञानामध्ये जपान येथील बायोफ्लॉक यंत्रणा, नेदरलँड, स्पेन, जर्मनी, थायलंड ई. देशातील विषमुक्त शेती उत्पादनासाठी आधुनिक औषधे, सेन्सर तंत्रज्ञानावर आधारित नेदरलँड, इंग्लंड, अमेरिका देशातील प्रगत मशिनरी, इस्त्राइल येथील सूक्ष्म सिंचन प्रणाली, इटली येथील सेन्सर चलित मशिनरी तंत्रज्ञान असणार आहे.

# पुण्यातील 487 गृहप्रकल्पांना स्थगिती!

## 10 हजार 773 व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील १० हजार ७३३ व्यापगत गृहनिर्माण प्रकल्पांना महारेराने कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९०५ प्रकल्पांना महारेराने स्थगिती दिली आहे. यात पुण्यातील सर्वाधिक ४८७ प्रकल्पांचा समावेश असून, त्यांची बँक खातीही गोठविण्यात आली आहेत.**




महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पूर्ततेची दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही माहिती अद्ययावत न करणाऱ्या १० हजार ७७३ व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या. या प्रकल्पांना अपेक्षित माहिती अद्ययावत करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला. या नोटिशींना ५ हजार ३२४ प्रकल्पांनी योग्य प्रतिसाद दिला. यापैकी ३ हजार ५१७ प्रकल्पांनी भोगवटा प्रमाणपत्र सादर केले आहे. याचवेळी ५२४ प्रकल्पांनी मुदतवाढीसाठी अर्ज केले आहेत. तसेच, १ हजार २८३ प्रकल्पांच्या प्रतिसादांची छाननी सुरू आहे, अशी माहिती महारेराने दिली आहे.नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे बँक खाते गोठवण्यात आले आहे. याचबरोबर या प्रकल्पांशी संबंधित खरेदी-विक्री व्यवहार करण्यावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. याबाबतच्या सूचना सहजिल्हा निबंधकांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रतिसाद न देणाऱ्या आणखी ३ हजार ४९९ प्रकल्पांवरील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, असेही महारेराने नमूद केले आहे.महारेरा नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करताना प्रत्येक विकासकाला प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख नोंदवावी लागते. प्रकल्प पूर्ततेच्या तारखेनंतर प्रकल्प पूर्ण झालेला असेल तर भोगवटा प्रमाणपत्रासह, प्रपत्र ४ सादर करावे लागते. प्रकल्प अपूर्ण असेल तर मुदतवाढीसाठीची प्रक्रिया सुरू करावी लागते. प्रकल्प सुरू करण्यातच काही अडचणी आलेल्या असल्यास प्रकल्प रद्द करण्यासाठी अर्ज करणे आवश्यक असते. प्रत्येक विकासकाला तिमाही आणि वार्षिक अशी विहित विवरण प्रपत्रे संकेतस्थळावर अद्ययावत करणे बंधनकारक आहे. मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांवर कारवाई केली जाते. प्रत्येक गृहनिर्माण प्रकल्पाने घर खरेदीदारांना प्रकल्पाची स्थिती कळावी, यासाठी कायद्याने अपेक्षित असलेली प्रकल्पस्थिती महारेराच्या संकेतस्थळावर त्रैमासिक, वार्षिक अशा कालबद्ध पद्धतीने अद्ययावत करणे बंधनकारक आहे. या नियमाची पूर्तता न करणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांवर कारवाईचे पाऊल उचलण्यात आले आहे.महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पूर्ततेची दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही माहिती अद्ययावत न करणाऱ्या १० हजार ७७३ व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या. या प्रकल्पांना अपेक्षित माहिती अद्ययावत करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला. या नोटिशींना ५ हजार ३२४ प्रकल्पांनी योग्य प्रतिसाद दिला. महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पूर्ततेची दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही माहिती अद्ययावत न करणाऱ्या १० हजार ७७३ व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या.

### 3 हजार प्रकल्पांवरील कारवाईची प्रक्रिया

१ हजार २८३ प्रकल्पांच्या प्रतिसादांची छाननी सुरू आहे, अशी माहिती महारेराने दिली आहे.नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे बँक खाते गोठवण्यात आले आहे. याचबरोबर या प्रकल्पांशी संबंधित खरेदी-विक्री व्यवहार करण्यावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. याबाबतच्या सूचना सहजिल्हा निबंधकांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रतिसाद न देणाऱ्या आणखी ३ हजार ४९९ प्रकल्पांवरील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, असेही महारेराने नमूद केले आहे.महारेरा नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करताना प्रत्येक विकासकाला प्रकल्प पूर्ण होण्याची तारीख नोंदवावी लागते. प्रकल्प पूर्ततेच्या तारखेनंतर प्रकल्प पूर्ण झालेला असेल तर भोगवटा प्रमाणपत्रासह, प्रपत्र ४ सादर करावे लागते. प्रकल्प अपूर्ण असेल तर मुदतवाढीसाठीची प्रक्रिया सुरू करावी लागते.

# आयआयबी शिक्षण संस्थेकडून विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

## प्रा. बानगुडे पाटील यांचे प्रेरणादायी विचार ऐकण्याची संधी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विद्यार्थ्यांना डॉक्टर, इंजिनिअर घडविण्यात मोलाचं मार्गदर्शन करणाऱ्या आयआयबी करिअर संस्थेच्या पिंपरी शाखेत रविवारी (ता.१२) प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ आणि प्रेरक वक्ते प्रा.नितीन बानगुडे-पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. "इन्स्पायर" या संस्थेच्या वार्षिक उपक्रमांतर्गत लालटोपीनगर मैदान, सम्राट चौक येथे सायंकाळी पाच वाजता त्यांना ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडकरांना चालून आली आहे.**



आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट ही संस्था गेल्या २५ वर्षापासून वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेचे प्रशिक्षण राज्यभर देत आहे. त्याव्दारे त्यांनी शेकडो डॉक्टर्स, इंजिनिअर्स घडविले आहेत. डॉक्टर्स, इंजिनिअर्स बनविणारी फॅक्टरी म्हणूनच ही संस्था ओळखली जाते. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनाही संस्था इन्स्पायर करणाऱ्या या व्याख्यानाला आवर्जून आमंत्रित करते. ते विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे व्यासपीठ असल्याने त्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयआयबीचे संस्थापक संचालक दशरथ पाटील यांनी केले आहे. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, सुनील शेळके,आण्णा बनसोडे, अमित गोरखे,उमा खापरे, मनपा आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित राहणार आहेत,अशी माहिती संस्थेचे पुणे विभाग संचालक ॲड. महेश लोहारे यांनी दिली. ॲड. लोहारे म्हणाले, नीट(NEET), आयआयटी (IIT), जेईई (JEE), सीईटी (CET) ची सर्वोत्तम प्रशिक्षण संस्था (कोचिंग इन्स्टिट्यूट) म्हणून आमच्या संस्थेची ओळख आहे.

### बानगुडे-पाटील यांचे व्याख्यान

काही गरीब मुलांना आम्ही मोफत प्रवेश देऊन शिकवितो. राज्यातील सर्वात मोठी स्कॉलरशिप परिक्षा घेतो. विद्यार्थ्यांना २०२२ मध्ये देशातील अग्रगण्य अशा एआयआयएमएसमध्ये प्रवेश मिळालेला असून नीटच्या इतिहासात पहिल्यांदा संस्थेच्या ३३ विद्यार्थ्यांनी २०२१ मध्ये जीवशास्त्रात पैकीच्या पैकी गुण मिळविलेले आहेत.विद्यार्थ्यांना डॉक्टर, इंजिनिअर घडविण्यात मोलाचं मार्गदर्शन करणाऱ्या आयआयबी करिअर संस्थेच्या पिंपरी शाखेत रविवारी (ता.१२) प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ आणि प्रेरक वक्ते प्रा.नितीन बानगुडे-पाटील यांचे व्याख्यान होणार आहे.

## महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनचा उपक्रम

# दिव्यांगांसाठी साजरा होणार 'पर्पल जल्लोष'!

### स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने दिव्यांगांसाठी भारतातील पहिला उत्सव




**। पिंपरी-चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने पर्पल जल्लोष –दिव्यांगांचा महाउत्सव साजरा करण्यात येणार आहे. हा तीन दिवसीय महोत्सव चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शनी केंद्र येथे १७ ते १९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. भारतात पिंपरी चिंचवड मनपातर्फे आयोजित करण्यात येणारा हा दिव्यांगांसाठीचा पहिलाच भव्य उत्सव असून दिव्यांगांच्या कल्याणासाठी उचललेले एक अग्रगण्य पाऊल असल्याचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.**

पर्पल जल्लोष हा महोत्सव दिव्यांगांची प्रतिभा आणि त्यांच्या नवकल्पनांना वाव देणारा तसेच दिव्यांगांच्या क्षमतामध्ये वाढ करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. दिव्यागांबाबत समाजात असलेल्या प्रचलित विचारांविषयी प्रबोधन करणे, दिव्यांग व्यक्तीं विषयी समाजात असलेले नकारात्मक समज बदलण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचे सर्वांगीण समावेशन करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवाचा हेतू असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

### असा असेल पर्पल जल्लोष

या उत्सवामध्ये दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या ४० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, विविध कार्पोरेट कंपन्या आणि विविध संस्था सहभागी होणार आहेत. याठिकाणी दिव्यांगांबाबतच्या सेवांची माहिती देणारे स्टॉल्स उभारणार असून प्रदर्शने देखील भरवली जाणार आहेत. सहभागी कंपन्याकडून दिव्यांगांसाठीच्या नवीन कल्पना, तंत्रज्ञान प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत. याशिवाय केंद्र सरकार, राज्य सरकार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिव्यांग व्यक्तींसह इतर नागरिकांना व्हावी यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. शिवाय दिव्यांगांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात येणार असून त्यांच्या कौशल्यानुसार त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची नोंदणी केली जाणार आहे.

पर्पल जल्लोष महोत्सवात विविध क्षेत्रातील कंपन्या, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि नवकल्पक विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी सोयीस्कर पद्धतीने आवश्यक साधनसामग्री आणि समावेशक समाज निर्माण करण्याचा उद्धेश साध्य करण्यासाठी ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (HMIL) या कंपनीने नोव्हेंबर २०२३ मध्ये 'समर्थ बाय ह्युंदाई' हा उपक्रम सुरू केला. 'मोबिलिटी' म्हणजे फक्त कार किंवा वाहतूक व्यवस्था नसून, मानवजातीच्या प्रगतीसाठी आणि प्रत्येक घटकाला संधींचे दरवाजे खुले करून समान अधिकार प्राप्त करून देण्यासाठी ह्युंदाई हा कृतीशील प्रयत्न करीत असून या विचाराने कंपनीने "पर्पल जल्लोष २०२५" साठी प्रायोजकत्व स्वीकारले आहे, असे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, फॅशन शो आणि रोजगार मेळावा

पर्पल जल्लोष महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या तसेच विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि सर्जनशील कौशल्याचे प्रदर्शन तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कलामंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांग नृत्य, गायन, अभिनय, गझल, कविता साहित्य संमेलन, अभिनय,फॅशन शो यासारखे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. तसेच दिव्यांगांच्या जीवनावर आधारित लेखन, साहित्य त्यांच्या प्रेरणादायी कथा आणि प्रवासाचा उलगडा करणारे विशेष सत्र देखील याठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे.

---

## वाकड-दत्तमंदिर रोडने घेतला मोकळा श्वास !

### पिंपरी-चिंचवडमधील मोठी अतिक्रमण कारवाई : सोसायटी फेडरेशन, सोसायटीधारकांच्या मागणीला यश

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**वाकड-दत्तमंदिर कॉंक्रीट रस्त्याचे काम अतिक्रमणांमुळे काम रखडले आहे. स्थानिक जागामालकांना महापालिकेने ९५ टक्के मोबदला दिला. परंतू, तेथील जागेवरचे अतिक्रमण काढले जात नव्हते. याबाबत 'महाईन्यूज'ने स्थानिक सोसायटीधारकांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला. महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशाने अखेर अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. रस्त्याच्या दुर्तफा असलेली पत्राशेड, आरसीसी बांधकाम अशी सरसकट अतिक्रमणे जमिनदोस्त करण्याची मोहीम हाती घेतली आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरातील आतापर्यंतची सर्वात मोठी अतिक्रमण कारवाई वाकड- दत्तमंदिर रोडवर करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी उभारलेली अनेक घरे 45 मीटर रस्त्यामध्ये बाधित झाली होती. ती घरेसुद्धा हटवण्यात आली. त्यामुळे या भागात प्रशासन आणि स्थानिक नागरिक असे तणावाचे वातावरण होते. मात्र, स्थानिक नागरिकांनी सामोपचाराने या कारवाईला सहकार्य केले असून, वादावादीचा प्रसंग उद्भवलेला नाही. दरम्यान, याच रस्त्यावर पुण्यातील एका मोठ्या बांधकाम व्यावसायिक कंपनीचा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पाचा काही भाग बाधित होत असतानाही त्यावर कारवाई केली नाही, असा काहीसा सूर अतिक्रमण कारवाई झालेल्या बाधित मालमत्ता धारकांचा आहे. त्यामुळे प्रशासनाने कारवाईमध्ये भेदभाव न करता निरपेक्ष कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. वाकड-दत्त मंदिर रस्त्याच्या प्रश्नावर 'महाईन्यूज'ने सातत्याने आवाज उठवला आहे. शहरातील आघाडीच्या प्रसारमाध्यमांसोबत 'महाईन्यूज'नेही महापालिका प्रशासनाला धारेवर धरले होते. तसेच रस्त्याचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी बातम्यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू होता. त्यामुळे सोसायटीधारकांमधून समाधान व्यक्त होत असून नागरिकांनी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

### सोसायटीधारकांचा एल्गार यशस्वी...

वाकड-दत्तमंदिर रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम गेल्या चार वर्षांपासून संथ गतीने सुरु आहे. रस्त्यांचे केवळ ६० टक्के काम पुर्ण झाले आहे. महापालिकेने संबंधित जागामालकांना ९५ टक्के मोबदला दिला होता. महापालिकेकडून जागेचा मोबदला घेवूनही रस्त्यावर ताबा स्थानिक जागा मालकांनी सोडत नव्हते. त्यामुळे रस्त्याचे काम रखडले आहे. पर्यायाने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. स्थानिक सोसायटीधारकांना दररोज सायंकाळी वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. तेथील नागरिक हैराण झाले आहेत. अतिक्रमण काढण्यासाठी सोसायटी फेडरेशनकडून आयुक्त, स्थापत्य विभाग, 'ड' क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे वारंवार पत्रव्यवहार करुनही अतिक्रमण काढले जात नव्हते.

# बीडचा बाहुबली !

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन एक महिना झाला. सर्वत्र प्रचंड गदारोळ सुरू आहे. पण, या हत्याकांडाचा गुंता सुटत नाही, दिवसेंदिवस तो वाढतच चालला आहे. या हत्याकांडातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड याच्यासह बहुतेक सर्व आरोपींना अटक झाली आहे, त्यांची चौकशी सुरू आहे. पण, शेवटी वाल्मीक कराडला पाठीशी घालत असल्याचा आरोप करून मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे संशयाचे बोट केले जात आहे.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

आरोपी कितीही मोठा असेल, त्याला आणि त्याची पाठराखण करणाऱ्याला कठोर शासन करण्याचे निर्देश आणि सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. त्या दृष्टीने सूत्रेही हलत आहेत. तपास यंत्रणांवर रोजच दबाव वाढत आहे आणि साहजिकच सरकार सुद्धा दबावाखाली आहे. वेगवेगळ्या गावांमध्ये किंवा शहरांमध्ये निघणारे जनआक्रोश मोर्चे शांत व्हायचे असतील, तर लवकरात लवकर हा खटला फास्टट्रॅक मध्ये अतिशय पारदर्शकपणे चालवावा आणि आरोपींना कठोर शासन व्हावे हीच सर्वसामान्यांची इच्छा आहे.

## धनंजय मुंडे यांचा राजीनामा शक्य

कदाचित, त्यामुळेच असे वाटून जाते की धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन वातावरण काहीसे हलके करण्याचा प्रयत्न सरकारकडून होणार असे दिसते. धनंजय मुंडे सत्तेवर असल्यामुळे वाल्मीक कराडच्या टोळक्याची चौकशी करण्यात तपास यंत्रणा हलगर्जीपणा करत आहेत, हा आरोप काहीसा सौम्य होऊ शकेल आणि वातावरणही निवळण्यास मदत होईल.

## वाल्मीक कराडकडे पैशाचा खजिना

या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याचे सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांची अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते, हे आता लपून राहिलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच नेते, त्यामध्ये शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यापासून अजित पवार, धनंजय मुंडे यांच्यापर्यंत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते स्थानिक आमदार सुरेश धस यांच्यापर्यंत सर्वांशीच कराडचे लागेबांधे होते, हे सिद्ध झालेले आहे. जिव्हाळ्याच्या संबंधांमध्येच काहीतरी विपरीत घडले असावे म्हणून कदाचित भाजपाचे आमदार सुरेश धस हे रोज वाल्मीक कराड याची पोलखोल करत आहेत, अनेक गौप्यस्फोट करत आहेत.

त्यांनी अगदी पुराव्यानिशी वाल्मीक कराडची आर्थिक बाजू आणि त्याच्या मालमत्तांचा जाहीर पंचनामा केला असल्यामुळे हा 'बीडचा बाहुबली' आणि त्याचे साम्राज्य पुढे आले आहे.

वाल्मीक कराडच्या सर्व कथा आता 'अरेबियन नाईट्स' प्रमाणे चर्चिल्या जाऊ लागल्या आहेत, अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. वाल्मीक कराडच्या आर्थिक साम्राज्याची पाळेमुळे दूरवर पसरली असून सर्व आकडेवारी अचंबित आणि आश्चर्यचकित करणारी आहे.

सुरेश धस यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीमुळे सर्वत्र सनसनाटी पसरली असून वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. वाल्मीक कराडचा उल्लेख आका असा केला जात असून त्याचे आणि त्याच्या आकाचे उद्योग परळीत ऐन जोमात सुरू असल्याचे धस यांचे म्हणणे आहे. त्यांनी यांचे मोठे कनेक्शन काढले असून पुण्यात फर्ग्युसन कॉलेज रोडवर सात मोठे दुकान गाळे आहेत. त्याच्या चालकाच्या नावावर तब्बल १५ कोटीचा एका भव्य इमारतीचा पूर्ण मजला असल्याचा गंभीर आरोप धस यांनी केला आहे. यातील प्रत्येक दुकानाची किंमत



पाच कोटीच्या वर आहे आणि आठवे दुकान हे एका आरोपीच्या बहिणीच्या नावावर असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

वाल्मीक कराड याचे दुसरे लग्न झाले असून त्याच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर तीन दुकाने आहेत. पुण्यातील मगरपट्टा परिसरात एका इमारतीचा 15 कोटींचा एकच संपूर्ण मजला त्याने खरेदी केला आहे. हा मजला त्याच्या चालकाच्या नावावर आहे असा आरोप करून धस यांनी पुरावे सादर केले आहेत.

### परळीमध्ये रिव्हॉल्वर विक्री, चरसचा व्यवसाय

परळी गावात इराणी समाजाचे बरेच लोक राहतात. या दोघांच्या जीवावर ते गांजा चरस आणि देशी विदेशी रिव्हॉल्वरची विक्री करतात. या इराणी लोकांकडून वाल्मीकी आणि त्याच्या साथीदारांना मोठा हिस्सा मिळतो. त्या वसुलीसाठी विशेष पोलिसांची नियुक्ती होते असा गंभीर आरोप धोस यांनी केला आहे

परळीमध्ये असलेल्या थर्मल प्लांट मधील भंगार दररोज चोरीला जाते आणि पोलिसांच्या साक्षीने त्याची विक्री होते, पोलिसांचा वाटा दिला जातो आणि उर्वरित रक्कम आक्का हडप करतो असा दावाही धस यांनी केला आहे. वाल्मीक कराड याची आणखी काही गुपिते या अनुषंगाने बाहेर पडली आहेत. शंभर कोटीपेक्षा जास्त मालमत्ता असणाऱ्या कराडच्या मागे २०२२ पासून ईडीचा ससेमिरा लागला आहे. त्यावेळी त्याला ईडीची पहिली नोटीस आली होती, त्यावेळीस त्याची मालमत्ता 100 कोटी पेक्षा जास्त होती.

## अनेकांच्या जमिनी हडप

वाल्मीक कराड ने जबरदस्तीने अनेक गोरगरिबांच्या जमिनी हडप केल्याचे ही पुढे आलेले आहे. त्याची संपूर्ण यादीच दूरदर्शन वरून सादर करण्यात आली आहे. आता या संशयाच्या मुद्द्यांवरून वाल्मीक कराड भोवती असलेले जाळे आणखी आवळले जाणार असून त्याचा फटका धनंजय मुंडे यांच्या पर्यंत नक्कीच पोहोचेल, असे समजण्यास सध्या तरी हरकत नाही.

## चौकशीमध्ये चांगलीच प्रगती

देशमुख खून प्रकरण एवढ्या मोठ्या प्रमाणावर गाजले असून गृहखात्याचे आणि सरकारचे त्यावर अगदी बारीक लक्ष आहे. आतापर्यंत जे जे आरोपी पकडले गेले आहेत त्यांची वेगवेगळ्या माध्यमातून सखोल चौकशी सुरू आहे. अनेकांचे मोबाईलही ताब्यात घेतले गेले असून त्यावरील संभाषणाच्या आधारे फासे टाकले जात आहेत. वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे या जोडीची बीड जिल्ह्यामध्ये किती ताकद आहे हे सुरेश धस वारंवार सांगत असले तरी कराड हा एकेकाळी धस यांचाच सहकारी होता. त्यामुळे विरोधकांकडून धस यांच्यावर आरोप होणे आता साहजिकच सुरू झाले आहे. त्यामध्ये धस यांची दादागिरी, तेथील बँका बुडवणे, गोरगरिबांना वेठीस धरून त्यांचे शोषण करणे, यासारखे गुन्हे पुढे येऊ लागले आहेत. एकूणच बीड जिल्ह्याचे दहशतवादाचे विदारक चित्र पुढे येऊ लागले असले तरी याला तेथील ओबीसी आणि मराठा यांच्यात असलेल्या संघर्षाचे स्वरूप देण्यात येणे, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. परळी मध्ये जे काही व्हायचे आहे ते सर्व धर्मांमध्ये सलोखा वाढवण्यासाठी महत्त्वाचे ठरावे, आणि तेथील दहशत संपून गोरगरिबांना समाधानाचे आणि सुखाचे दोन घास खायला मिळावेत, एवढीच आता अपेक्षा !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रित केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीसांच्या वक्तव्याने हास्यकल्लोळ!

## राज ठाकरे मित्र आहेत आणि उद्धव ठाकरे शत्रू नाहीत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात पहाटेच्या शपथविधीचा उल्लेख करत असं काहीसं वक्तव्य केलं उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. नागपूर या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलं. दिवंगत विलासजी फडणवीस यांच्या जयंती निमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी पहाटेच्या शपथविधीची आठवण करुन देत देवेंद्र फडणवीस यांनी एक खास वक्तव्य केलं.**



“संयम, सहनशीलता याची अपूर्व देणगी मला राजकारणातून मिळाली. राजकारणात आल्यानंतर तुम्हाला वाटेल तसे, वेळ प्रसंगी अपशब्दही सहन करावे लागतात. गत पाच वर्षात काहींनी अनेक पद्धतीने मला अपमानित करण्याचा प्रयत्न केला. यात माझ्या कुटुंबाच्याही वाट्याला बरंच काही आलं. ही सहनशक्ती, संयम, एका अर्थाने स्थितप्रज्ञता मी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कडून शिकलो ” असं प्रतिपादन देवेंद्र फडणवीस यांनी केलं.“विद्यार्थी चळवळीत असतांना मला राजकारणात येण्याची अजिबात इच्छा नव्हती. एक स्वयंसेवक म्हणून आपल्या परिने समाजाला योगदान द्यायचं हे मी निश्चित केलेले होते. स्वयंसेवकाला जे सांगितलं ते त्यानं करायचं असतं असं विलासजी फडणवीस यांनी सांगितलं, ज्यामुळे माझ्यापुढे काहीही पर्यायच त्यांनी ठेवला नाही, राजकारणात सहनशक्तीचा कस लागतो. समाजात जे काही चांगले दिसलं तर मी त्यापासून शिकत आलो आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीकोनातून जे प्रकल्प हाती घेतले ते त्याच शिकवणुकीतून मी पूर्ण करत आलो. स्वर्गिय विलासजी फडणवीस यांच्यातील उपक्रमशिलतेचा गुण मी अंगिकारला असे सांगून त्यांनी त्यांच्या कार्याला उजाळा दिला. कॅन्सर इन्स्टिट्युट पासून इतर संस्था या समाजाला योगदान देणाऱ्या अशा व्यक्तिंप्रितिची एक कृतज्ञता असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.महाराष्ट्राची राजकीय संस्कृती ही आपण आणली पाहिजे. सर्वसामान्यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा अधिक सकारात्मक, आश्वासक झाला पाहिजे याद्दष्टीने मी आता मुख्यमंत्री झाल्यानंतर अगोदर हे जाहीर केले आहे . कोणत्याही खोट्या आरोपातून केलेल्या नकारात्मक वातावरणाला आता समाज मान्यता देत नाही हे या निवडणुकीतून सिद्ध झालं आहे. एका दृष्टीने कलुषित झालेल्या राजकारणाला लोकांनीच शुद्ध करण्याकरीता घेतलेला हा पुढाकार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राजकारणात कोणीही कायमचे शत्रू नसतात. राजकारणात काहीही होऊ शकते. सकाळचा शपथविधी नको म्हणून यावेळी आम्ही सायंकाळी शपथविधी ठेवला असं एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी सांगितल्यावर सभागृहात हशा पिकला. विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार सत्तेत आलं. महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. त्यानंतर नागपूरच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आदित्य ठाकरे यांनीही देवेंद्र फडणवीस यांची एक ते दोन वेळा विकासकामांच्या मुद्द्यांवरून भेट घेतली होती. या भेटींमुळे राज्यात पुन्हा नवी समीकरण पाहायला मिळणार का? अशा चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान, यावरही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचक प्रतिक्रिया दिली. नागपूरमध्ये आज जिव्हाळा पुरस्कार वितरण समारंभात देवेंद्र फडणवीस याची मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत मुख्यमंत्री फडणवीस यांना विविध राजकीय प्रश्न विचारण्यात आले. यावर फडणवीसांनीही आपल्या शैलित प्रश्नांची ‘राजकीय’ उत्तरं दिली. यावेळी राज ठाकरे की उद्धव ठाकरे? एकनाथ शिंदे की अजित पवार? असे प्रश्न विचारण्यात आले.

### अजित पवार की एकनाथ शिंदे?

यावर देवेंद्र फडणवीस यांनी मनमोकळ्यापणे उत्तरे दिली. मुलाखतीच्या रॅपीड फायरमध्ये देवेंद्र फडणवीस यांना अजित पवार की एकनाथ शिंदे? असा प्रश्न विचारला असता फडणवीस म्हणाले, “माझ्यापुरतं विचारलं तर माझे दोघांशी देखील अतिशय चांगले संबंध आहेत. एकनाथ शिंदे यांच्याशी माझी जुनी मैत्री आहे. तसेच अजित पवार यांच्यामध्ये एक राजकीय परिपक्तवता असल्यामुळे त्यांचे आणि माझे सूर मोठ्या प्रमाणात जुळतात”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.या प्रश्नावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, “पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अनुशासित राजकारणी आहेत. त्यांनी जो मार्ग पकडला त्या मार्गावरून मग कितीही अडचणी आल्या तरी त्यामधून बाजूला व्हायचं नाही हे अनु अनुशासन फार कठीण आहे. आता मग मला विचारलं तर त्यांच्या एवढं १० टक्केही माझ्याकडे अनुशासन नाही. त्यामुळे त्यांना कठोर म्हणता येणार नाही. तसेच अमित शाह असे आहेत की त्यांना जर आपण असं म्हटलं की एखादा राजकीय दृष्टीने निर्णय करायचा तर ते घेऊ शकतात”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

# ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

## बिल भरणाऱ्याचा टक्का वाढविण्याच्या हेतूने ग्राहक योजना

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.**




ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (LT LIVE) वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे. ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

### लकी ड्रा ऑनलाईन काढण्यात येणार

महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास WWW.MAHADISCOM.IN भेट द्यावी.

# लष्करी सामर्थ्यासाठी बांगलादेश-तुर्कियेमध्ये करार!

## बांगलादेशने भारत आणि इस्त्रायलच्या शत्रूला केले जवळ

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशने अलीकडेच भारत आणि इस्त्रायलचा शत्रू तुर्किये यांच्याशी हातमिळवणी केली आहे. अलीकडे, बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी तुर्कियेचे व्यापार मंत्री प्राध्यापक डॉ. उमर बोलात यांची भेट घेतली. यादरम्यान दोन्ही देशांनी लष्करी, व्यापार आणि आर्थिक स्तरासह अनेक क्षेत्रात संबंध दृढ करण्यासाठी चर्चा केली.**



बांगलादेश भारत आणि इस्त्रायल या दोन्ही देशांच्या शत्रूंना सामावून घेत आहे. बांगलादेशने आपले लष्करी सामर्थ्य मजबूत करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. तुर्कियेचा पाकिस्तानकडे कल असल्यामुळे, तुर्कियेच्या भारतासोबतच्या संबंधांमध्ये तणाव कायम आहे. तसेच, इस्रायल आणि हमासमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे, तुर्कीने मे 2024 मध्ये इस्रायलसोबत कोणत्याही प्रकारच्या आयात आणि निर्यातीवर बंदी घातली होती. बांगलादेश आता स्वत:ला बळकट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे आणि त्यासाठी त्यांनी तुर्कियेशी हातमिळवणी केली आहे. तुर्कीचे व्यापार मंत्री प्रोफेसर डॉ. उमर बोलात 9 जानेवारी रोजी त्यांच्या शिष्टमंडळासह ढाका येथे पोहोचले. जिथे त्यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांची भेट घेतली.या भेटीत बांगलादेश आणि तुर्कस्तानने व्यापारापासून लष्करापर्यंत अनेक मुद्द्यांवर संबंध मजबूत करण्यावर चर्चा केली. बांगलादेश आणि तुर्कीने संरक्षण उद्योगात सहकार्याच्या शक्यतेवर चर्चा केली. या बैठकीदरम्यान मुख्य सल्लागार प्राध्यापक युनूस यांनी तुर्कीने आपले तंत्रज्ञान बांगलादेशात आणावे आणि येथे शक्य तितकी गुंतवणूक करावी, असे आवाहन केले. इथे तुमचा कारखाना उभारा आणि त्यात बांगलादेशातील लोकांना सहभागी कराइस्रायली राजकारणी नेतन्याहूंना अटक करायची की नाही? अमेरिकेच्या 'या' निर्णयामुळे इतर देशही बुचकळ्यातया भेटीत प्रोफेसर युनूस यांनी तुर्कस्तानचे व्यापार मंत्री प्रोफेसर डॉ.ओमर बोलात यांना सांगितले, तुमचा देश तंत्रज्ञानात अग्रेसर आहे, तुम्ही तुमचा संरक्षण उद्योग येथे उभारू शकता. चला नवीन सुरुवात करूया. तुम्हाला जे काही हवे आहे, आम्ही तुम्हाला मदत करण्यासाठी येथे आहोत. युनूस म्हणाले, बांगलादेश आणि तुर्किये यांच्यात विविध क्षेत्रात परस्पर सहकार्याद्वारे मजबूत संबंध निर्माण करण्याची ताकद आहे. बांगलादेशच्या मुख्य सल्लागारांनी तुर्कस्तानच्या व्यापार मंत्र्यांना सांगितले की, आता खूप गोष्टी करायच्या आहेत, आम्हाला तुमची साथ, तुमचे तंत्रज्ञान आणि तुमच्या गुंतवणुकीची गरज आहे. बांगलादेशला जगातील 8 वा सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश म्हणून वर्णन करताना, मोहम्मद युनूस म्हणाले, अंतरिम सरकार देशातील तरुणांसाठी अधिक रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे आणि त्यासाठी तुर्कीच्या मदतीची आवश्यकता आहे. तुर्कीचे मंत्री प्रोफेसर ओमर बोलात म्हणाले की बांगलादेश आणि तुर्किये वस्त्रोद्योगाच्या पलीकडे इतर गोष्टींपर्यंत आपले सहकार्य वाढवू शकतात. संरक्षण उद्योग, आरोग्य सेवा फार्मास्युटिकल्स आणि कृषी यंत्रसामग्री या क्षेत्रात तुर्किए आणि बांगलादेश यांच्यात आर्थिक सहकार्य होऊ शकते, असे ते म्हणाले. तसेच, भारताचा उल्लेख करताना तुर्की मंत्री म्हणाले की, बांगलादेशच्या आयातीमध्ये आम्ही भारत आणि इतर बाजारपेठांची जागा घेऊ शकतो. आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रत्येक स्तरावर सहकार्य होऊ शकते. बांगलादेश आणि तुर्किए विद्यापीठ स्तरावरही सहकार्य करू शकतात, असेही ते म्हणाले.बांगलादेश भारत आणि इस्रायल या दोन्ही देशांच्या शत्रूंना सामावून घेत आहे. बांगलादेशने आपले लष्करी सामर्थ्य मजबूत करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे.

### शिष्टमंडळासह ढाका येथे पोहोचले

तुर्कियेचा पाकिस्तानकडे कल असल्यामुळे, तुर्कियेच्या भारतासोबतच्या संबंधांमध्ये तणाव कायम आहे. तसेच, इस्रायल आणि हमासमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे, तुर्कीने मे 2024 मध्ये इस्रायलसोबत कोणत्याही प्रकारच्या आयात आणि निर्यातीवर बंदी घातली होती. बांगलादेश आता स्वत:ला बळकट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे आणि त्यासाठी त्यांनी तुर्कियेशी हातमिळवणी केली आहे. तुर्कीचे व्यापार मंत्री प्रोफेसर डॉ. उमर बोलात 9 जानेवारी रोजी त्यांच्या शिष्टमंडळासह ढाका येथे पोहोचले. जिथे त्यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांची भेट घेतली.या भेटीत बांगलादेश आणि तुर्कस्तानने व्यापारापासून लष्करापर्यंत अनेक मुद्द्यांवर संबंध मजबूत करण्यावर चर्चा केली. बांगलादेश आणि तुर्कीने संरक्षण उद्योगात सहकार्याच्या शक्यतेवर चर्चा केली. या बैठकीदरम्यान मुख्य सल्लागार प्राध्यापक युनूस यांनी तुर्कीने आपले तंत्रज्ञान बांगलादेशात आणावे आणि येथे शक्य तितकी गुंतवणूक करावी, असे आवाहन केले.

# आपल्याच देशातील गावावर एअर स्ट्राइक

## हल्ल्यात 40 जणांचा मृत्यू, वांशिक अल्पसंख्याक गटाचं नियंत्रण

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**म्यानमारच्या लष्कराने आपल्याच देशातील पश्चिम भागात असलेल्या एका गावावर एअर स्ट्राइक केला असून यात ४० नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर २० जण जखमी आहेत. या गावावर सशस्त्र वांशिक अल्पसंख्याक गटाचं नियंत्रण आहे, अशी माहिती गटाचे अधिकारी आणि स्थानिक धर्मादाय संस्थेने दिली.**



लष्काराकडून करण्यात आलेल्या हल्ल्यातून लागलेल्या आगीत शेकडो घरे जळून खाक झाली आहेत. पश्चिम राखीन राज्यातील अरकान आर्मीच्या नियंत्रणाखाली असलेल्या रामरी बेटावरील क्यौक नी माव गावावर बुधवारी हल्ला करण्यात आल्याची माहिती गटाचे अधिकारीने दिलीय. मात्र याबाबत लष्कराकडून या भागात कोणत्याही हल्ला करण्यात आल्याची माहिती देण्यात आलेली नाहीये. दरम्यान गावातील परिस्थिती काय आहे याची माहिती अद्याप मिळू शकलेली नाहीये.मात्र या भागातील इंटरनेट आणि सेलफोन सेवा बंद आहेत. लष्कराने फेब्रुवारी २०२१ मध्ये निवडून आलेल्या आँग सान स्यू की यांच्या सरकारची हकालपट्टी केल्यानंतर म्यानमारमध्ये हिंसाचार सुरू झालाय. शांततापूर्ण निदर्शने दडपण्यासाठी लष्कराने प्राणघातक शक्तीचा वापर केल्यानंतर लष्करी राजवटीच्या अनेक विरोधकांनी शस्त्रे हाती घेतली आहेत. देशाचा मोठा भाग हतबल झाला आहे. संघर्षात अडकले. म्यानमारच्या सैन्याने केलेल्या हल्ल्याची माहिती आरकन दलाचे प्रवक्ते खैईंग थुखा यांनी दिलीय. जेट फायटर विमानांनी बुधवारी गावावर बॉम्बचा वर्षाव केला. यात ४० नागरिकांचा जीव गेला आहे तर २० पेक्षा जास्त जण जखमी झालेत. मृत झालेल्या सर्व जण नागरिक होते.

### 500 पेक्षा जास्त घरे जळून खाक

तर जखमींमध्ये महिला आणि मुलांचा समावेश आहे. तर एअर स्ट्राइकमुळे गावातील घरांना आग लागली. यात ५०० पेक्षा जास्त घरे जळून खाक झाली आहेत, अशी माहितीही खैईंग थुखा यांनी दिलीय. भारताचा शेजारी देश मान्यमारमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या घडामोडी घडत असून काही भागांमध्ये यादवी माजली आहे. युनायटेड लीग ऑफ अराकान (यूएलए) आणि तिची लष्करी शाखा अराकान आर्मीसाठी तीन महिन्यांपूर्वी या भागावर नियंत्रण मिळवणं अशक्य वाटत होतं.

## महाकुंभ मेळ्यात सुरांची बरसात

सध्या सर्वत्र महाकुंभ मेळ्याची चर्चा सुरू आहे. यावर्षी महाकुंभ मेळ्याचं आयोजन उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे करण्यात आलं आहे. १३ जानेवारीपासून महाकुंभ मेळ्याची सुरुवात होणार आहे. अवघे तीन दिवस बाकी असल्यामुळे सध्या प्रयागराजमध्ये लगबग पाहायला मिळत आहे. १४ जानेवारीला पहिलं स्नान होणार आहे. नुकतीच सांस्कृतिक मंत्रालयाकडून महाकुंभ मेळ्यात होणाऱ्या परफॉर्मन्सची यादी जाहीर केली. यामध्ये अनेक दिग्गज गायकांसह मराठी कलाकारांची नावं सामील आहेत. १६ जानेवारीला महाकुंभ मेळ्यात प्रसिद्ध गायक, संगीतकार शंकर महादेवन यांचा परफॉर्मन्स होणार आहे. त्यानंतर १७ जानेवारीला मराठीतील लोकप्रिय गायक महेश काळे यांच्या मंत्रमुग्ध सुरांमध्ये भाविक दंग होणार आहेत. शेवटच्या दिवशी मोहित चौहानच्या भावगीतांसह महाकुंभ मेळ्याचा समारोप असणार आहे.संपूर्ण महाकुंभ मेळ्यात कैलाश खेर, शान मुखर्जी, हरिहरन, कविता कृष्णमूर्ती, कविता सेठ, ऋषभ रिखीराम शर्मा, शोवना नारायण, डॉ. एल सुब्रमण्यम, बिक्रम घोष, मालिनी अवस्थीसह अनेक कलाकार परफॉर्मन्स करणार आहे. यामध्ये ज्येष्ठ गायक पद्मश्री सुरेश वाडकर, राहुल देशपांडे, देवकी पंडीत, सुभद्रा देसाई हे मराठी कलाकार मंडळींचादेखील परफॉर्मन्स होणार आहे. याचे सांस्कृतिक मंत्रालयाने एक प्रसिद्धीपत्रक जारी केलं आहे. ज्यामध्ये असं म्हटलं आहे की, या कार्यक्रमांचे उद्दिष्ट भाविकांसाठी एक मंत्रमुग्ध करणारे आध्यात्मिक वातावरण निर्माण करणं आहे. दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रयागराजला भेट दिली.

## सरकार-सानिकाच्या प्रेमावर पंकजा आणणार 'संक्रांत'

मकरसंक्रांत अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. १४ जानेवारीला हा सण अतिशय उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जातो. तीळगुळ किंवा तिळाचे लाडू देऊन गोड-गोड बोलण्याचा संदेश दिला जातो. त्यामुळे सध्या मकरसंक्रांत साजरी करण्यासाठी लगबग सुरू आहे. दुसऱ्या बाजूला मकरसंक्रांतीनिमित्ताने 'कलर्स मराठी' वाहिनीवरील '#लय आवडतेस तू मला' आणि 'पिंगा गं पोरी पिंगा' या दोन मालिकेचे एक तासाचे विशेष भाग पाहायला मिळणार आहेत.'कलर्स मराठी' वाहिनीवरील '#लय आवडतेस तू मला' मालिकेला प्रेक्षकांनी भरभरून प्रेमं दिलं. मालिकेमधील सरकार आणि सानिकाची जोडी, त्यांच्यातील मैत्री, भांडण, कडू – गोड आठवणी, त्यांचा आतापर्यंतचा प्रवास याचे प्रेक्षक साक्षी आहेत. सरकार-सानिकाने नेहेमीच त्यांच्यासमोर येणाऱ्या आव्हानांना खंबीरपणे उत्तर दिलं आहे. तर दुसरीकडे 'पिंगा गं पोरी पिंगा' मालिकेतील पाच जणींची मैत्री, त्यांच्यावर येणारी संकटं, त्यांचं नातं, त्यांच्यातील भांडणं हेदेखील बघायला प्रेक्षकांना आवडत आहे. या मालिकेचा मकरसंक्रांती निमित्ताने एक तासाचा भाग रंगणार आहे.



## तेजश्री प्रधानची झाली एक्झिट

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'प्रेमाची गोष्ट'मध्ये मोठा बदल झाला आहे. 'प्रेमाची गोष्ट'मध्ये प्रमुख भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री तेजश्री प्रधानने अचानक मालिकेला रामराम केला आहे. त्यामुळे सध्या तेजश्री चाहत्यांसह 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या प्रेक्षकांमध्ये नाराजीचं वातावरण पसरलं आहे. 'तू मालिका सोडू नकोस', 'मालिका सोडण्यामागचं कारण काय?', अशा प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटल्या आहेत. आता नवी मुक्ता साकारणाऱ्या अभिनेत्रीने चित्रीकरणाला सुरुवात केली आहे.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. लवकरच स्वरदा मुक्ताच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. स्वरदाने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेच्या चित्रीकरणाला नुकतीच सुरुवात केली आहे. तिने इन्स्टाग्रामवर स्क्रिप्टचा फोटो शेअर केला आहे. "नवीन वर्षाची नवी सुरुवात", असं तिने त्या फोटोवर लिहिलं होतं. स्वरदाची ही इन्स्टाग्राम

## विराट पोहोचला वृंदावनमध्ये!

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी अभिनेत्री अनुष्का शर्मा आपल्या दोन्ही मुलांसह प्रेमानंद महाराजांच्या आश्रमात दर्शनासाठी पोहोचले आहेत. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरून परतल्यावर, विराट-अनुष्काने वृंदावनमधील प्रेमानंद गोविंद शरण महाराजांच्या आश्रमात जाऊन त्यांचं दर्शन घेतलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.विराट-अनुष्काने यापूर्वी देखील प्रेमानंद महाराजांच्या आश्रमाला भेट दिली होती. आश्रमात पोहोचताच सर्वप्रथम या दोघांनी प्रेमानंद महाराजांना नमस्कार केल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. "तू आनंदी आहेस का?" यावर कोहलीने मान हलवत 'हो' म्हटलं आणि तो हसताना दिसला. यानंतर अनुष्काने त्यांच्याशी संवाद साधला. अनुष्काने प्रेमानंद महाराजांना म्हणाली, "जेव्हा मी मागच्या वेळेला इथे आले होते तेव्हा माझ्या मनात अनेक प्रश्न होते. पण, तिथे उपस्थित असलेल्या सर्वांनी आधीच ते सगळे प्रश्न विचारले. तुम्ही मला फक्त प्रेम आणि भक्ती द्या." यावर प्रेमानंद महाराज म्हणाले, "तुम्ही खूप धाडसी आहात कारण, या समाजात एवढा सन्मान मिळाल्यानंतर पुन्हा भक्ती मार्गावर वळणारे फार कमी लोक असतात.

## अखेर अंकिताच्या घरी 'ती' आलीच!

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.अंकिताने सोशल मीडियावर 'ती येतेय', 'ती आलीये... वाट बघतेय' अशा पोस्ट शेअर तिच्या सगळ्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण केली होती. अंकिताने नेमकं काय सरप्राइज देणार याची तिचे चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर नव्या गाडीची पहिली झलक तिने फोटो शेअर करत सर्वांना दाखवली आहे. अंकिता वालावलकरने ऑडी ही आलिशान गाडी खरेदी केली आहे. गाडीचा पहिला फोटो शेअर करत याला 'कोकण हार्टेड गर्ल'ने 'आवडी आली' असं कॅप्शन दिलं आहे.गाडी खरेदी करताना अंकितासह तिचा होणारा नवरा कुणाल देखील उपस्थित होता. काही दिवसांपूर्वीच तिने आपली पहिली कार विकली होती. ही कार विकल्यावर अंकिताने, दुसरी गाडी घ्यायचा विचार होता म्हणून जुनी गाडी विकली. सध्या मी दोन-तीन गाड्यांमध्ये कन्फ्युज असल्याचं सांगितलं होतं. त्यामुळे अंकिता लवकरच नवीन गाडी खरेदी करेल याची हिंट सर्वांना आधीच मिळाली होती. अखेर नव्या गाडीचा फोटो शेअर करत 'कोकण हार्टेड गर्ल'ने ही आनंदाची बातमी सर्वांना दिली आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांत अनेक सेलिब्रिटींनी नवीन गाड्या खरेदी केल्याचं पाहायला मिळालं आहे. यात आता अंकिताचं नाव देखील जोडलं गेलं आहे. अंकिताच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर तिला प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून ओळखलं जातं. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली. या सीझनच्या महाअंतिम फेरीपर्यंत ती पोहोचली होती.आता वैयक्तिक आयुष्यात लवकरच कोकण हार्टेड गर्ल विवाहबंधनात अडकणार आहे. सध्या नव्या गाडीसाठी सगळ्या चाहत्यांनी अंकितावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे अंकिता वालावलकर महाराष्ट्राच्या घराघरांत लोकप्रिय झाली. गेल्या काही महिन्यांपासून ही 'कोकण हार्टेड गर्ल' तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. येत्या काही दिवसात अंकिता संगीत दिग्दर्शक कुणाल भगतशी लग्नगाठ बांधणार आहे. यापूर्वी 'कोकण हार्टेड गर्ल'ने तिच्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. ती म्हणजे अंकिताच्या घरी नव्या गाडीचं आगमन झालेलं आहे.अंकिताने सोशल मीडियावर 'ती येतेय', 'ती आलीये... वाट बघतेय' अशा पोस्ट शेअर तिच्या सगळ्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण केली.



# आकाश दीपने काय चूक केली?

## मनोज तिवारीने पुन्हा एकदा गौतम गंभीरला केलं लक्ष्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी भारतीय क्रिकेटपटू मनोज तिवारीने पुन्हा एकदा टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यावर निशाणा साधला आहे. अलीकडेच मनोज तिवारीने गंभीरला 'ढोंगी' म्हटले होते. त्यानंतर हर्षित राणा आणि नितीश राणा मुख्य प्रशिक्षकाच्या समर्थनार्थ समोर आले होते. आता मनोज तिवारीने पुन्हा एकदा गंभीरवर टीका केली आहे. तो म्हणाला, गंभीरने त्याच्या कुटुंबालाही शिवीगाळ केली होती. इतकेच नाही तो गंभीरने सौरव गांगुलीबद्दल वाईट बोलल्याचे तिवारी म्हणाला.**





हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना तिवारी म्हणाले,'नितीश राणा आणि हर्षित राणा गौतम गंभीरला पाठिंबा का देणार नाहीत? आकाश दीपच्या जागी हर्षित राणाला पर्थमध्ये स्थान मिळाले. हे कसे शक्य झाले? आकाश दीपने काय चूक केली? बांगलादेश आणि न्यूझीलंडविरुद्ध त्याने शानदार गोलंदाजी केली होती. वेगवान गोलंदाज म्हणून तुम्ही अनुकूल परिस्थितीत गोलंदाजी करण्याचे स्वप्न पाहता, परंतु तुम्ही त्याला वगळले आणि प्रथम श्रेणीचा फारसा अनुभव नसलेल्या हर्षितचा समावेश केला. आकाश दीपचा रेकॉर्ड खूप चांगला आहे. ही पूर्णपणे पक्षपाती निवड आहे. त्यामुळेच हे खेळाडू पुढे येऊन त्याचे बचाव करतील. तो पुढे म्हणाला, "मी काहीही चुकीचं बोललो नाही. मी ज्याबद्दल बोलतोय ते पीआर आहे. यापूर्वी असे कधीच घडलं नव्हतं. जेव्हा कोणी काहीतरी वस्तुस्थितीवर आधारित बोलतो, तेव्हा लोक त्या व्यक्तीचा बचाव करण्यासाठी पुढे येतात, परंतु ते मला ओळखत नाहीत. मी फक्त वस्तुस्थितीच्या आधारावर बोलतो. पीआर पूर्णपणे स्पष्ट आहे." तिवारीने गंभीरसोबतच्या त्याच्या नात्याची काही जुनी गुपितेही उघड केली. तो म्हणाला की, गंभीरने माझी कुटुंबाला शिवीगाळ केली होती आणि सौरव गांगुलीबद्दल वाईट बोलला होता.मनोज तिवारी पुढे म्हणाला, 'दिल्लीतील रणजी ट्रॉफी सामन्यादरम्यान गौतम गंभीरच्या तोंडून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द सर्वांनी ऐकला. मग तो सौरव गांगुलीबद्दल वाईट बोललेला असो किंवा माझ्या कुटुंबाला शिव्या दिलेल्या असो. त्याला काही लोकांनी वाचवले होते. मी ज्या पीआरबद्दल बोलत आहे तो हा आहे. खेळाडूंची निवड करून त्यांना प्लेइंग इलेव्हनमध्ये निवडण्याची प्रक्रिया योग्य पद्धतीने होत नाही. हर्षित राणासाठी आकाश दीपला वगळले. जर तुम्हाला वाटतं होतं हर्षित इतका चांगला आहे, तर तुम्ही त्याला उर्वरित मालिकेत का नाही खेळवलं?'बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये गंभीरच्या निर्णयांबाबत तिवारी साशंक आहे. हर्षित राणा आणि देवदत्त पडिक्कल या खेळाडूंच्या निवडीवर त्यानी प्रश्न उपस्थित केला. तो म्हणाला, 'देवदत्त पडिक्कलचा कसोटी संघात समावेश कसा झाला, तो समीकरणाच्या बाहेर होता. सतत इतक्या धावा करणाऱ्या अभिमन्यू ईश्वरनऐवजी तो संघात कसा आला? त्याने इतक्या धावा केल्या आहेत. त्याची निवड का झाली नाही? असे प्रकार घडत असून त्याचे परिणाम सर्वांसमोर आहेत. हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना तिवारी म्हणाले,'नितीश राणा आणि हर्षित राणा गौतम गंभीरला पाठिंबा का देणार नाहीत? आकाश दीपच्या जागी हर्षित राणाला पर्थमध्ये स्थान मिळाले. हे कसे शक्य झाले? आकाश दीपने काय चूक केली? बांगलादेश आणि न्यूझीलंडविरुद्ध त्याने शानदार गोलंदाजी केली होती. वेगवान गोलंदाज म्हणून तुम्ही अनुकूल परिस्थितीत गोलंदाजी करण्याचे स्वप्न पाहता, परंतु तुम्ही त्याला वगळले आणि प्रथम श्रेणीचा फारसा अनुभव नसलेल्या हर्षितचा समावेश केला. आकाश दीपचा रेकॉर्ड खूप चांगला आहे. ही पूर्णपणे पक्षपाती निवड आहे. त्यामुळेच हे खेळाडू पुढे येऊन त्याचे बचाव करतील.

### संघ निवडीवर व्यक्त केली शंका

हिंदुस्तान टाईम्सशी बोलताना तिवारी म्हणाले, 'नितीश राणा आणि हर्षित राणा गौतम गंभीरला पाठिंबा का देणार नाहीत? आकाश दीपच्या जागी हर्षित राणाला पर्थमध्ये स्थान मिळाले. हे कसे शक्य झाले? आकाश दीपने काय चूक केली? बांगलादेश आणि न्यूझीलंडविरुद्ध त्याने शानदार गोलंदाजी केली होती. वेगवान गोलंदाज म्हणून तुम्ही अनुकूल परिस्थितीत गोलंदाजी करण्याचे स्वप्न पाहता, परंतु तुम्ही त्याला वगळले आणि प्रथम श्रेणीचा फारसा अनुभव नसलेल्या हर्षितचा समावेश केला. आकाश दीपचा रेकॉर्ड खूप चांगला आहे. ही पूर्णपणे पक्षपाती निवड आहे. त्यामुळेच हे खेळाडू पुढे येऊन त्याचे बचाव करतील.तो पुढे म्हणाला, "मी काहीही चुकीचं बोललो नाही. मी ज्याबद्दल बोलतोय ते पीआर आहे. यापूर्वी असे कधीच घडलं नव्हतं. जेव्हा कोणी काहीतरी वस्तुस्थितीवर आधारित बोलतो, तेव्हा लोक त्या व्यक्तीचा बचाव करण्यासाठी पुढे येतात, परंतु ते मला ओळखत नाहीत. मी फक्त वस्तुस्थितीच्या आधारावर बोलतो. पीआर पूर्णपणे स्पष्ट आहे.

# अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार

## क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने आपली भूमिका केली स्पष्ट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पूर्वी अफगाणिस्तान क्रिकेट संघाच्या अडचणी संपताना दिसत नाही. यापूर्वी इंग्लंडच्या राजकारण्यांनी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानशी सामना न खेळण्याची मागणी केली होती आणि आता दक्षिण आफ्रिकेचे क्रीडामंत्री गेटन मॅकेन्झी यांनी या स्पर्धेत अफगाणिस्तानवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान आणि दुबईमध्ये हायब्रीड मॉडेल अंतर्गत होणार आहे.**




चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये अफगाणिस्तानप्रमाणेच इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका एकाच गटात आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या क्रीडामंत्र्याच्या आधी, १६० हून अधिक ब्रिटिश राजकारण्यांनी इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड (ईसीबी) ला पुढील महिन्यात अफगाणिस्तानविरुद्धच्या चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट सामन्यावर बहिष्कार टाकण्याची विनंती केली होती. २०२१ मध्ये तालिबान सत्तेत परतल्यानंतर महिलांचा खेळातील सहभाग प्रभावीपणे बेकायदेशीर ठरला आहे. हा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) नियमांचेही उल्लंघन आहे, परंतु अफगाणिस्तानला आयसीसी स्पर्धांमध्ये भाग घेण्याची परवानगी आहे.कराची येथे २१ फेब्रुवारीपासून चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ब गटातील सामन्यात दक्षिण आफ्रिकेला अफगाणिस्तानशी खेळायचे आहे. तथापि, मॅकेन्झीने दक्षिण आफ्रिकन क्रिकेटला या संघाविरुद्ध खेळण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याचे आवाहन केले आहे. जेणेकरून महिलांच्या हक्कांबाबत एक मजबूत संदेश जाऊ शकेल. मॅकेन्झी म्हणाले की, 'क्रिकेट दक्षिण आफ्रिका, इतर देशांच्या संघटना आणि आयसीसीने त्यांना खेळातील महिलांच्या हक्कांबाबत काय संदेश द्यायचा आहे, याचा विचार केला पाहिजे.

### महिलांच्या हक्कांबाबत काय संदेश द्यायचा

क्रीडा मंत्री या नात्याने दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानविरुद्ध खेळावे की नाही याबाबत अंतिम निर्णय घेणे माझ्या हातात नाही. जर माझ्या हातात असते, तर नक्कीच निर्णय घेतला असता.'दक्षिण आफ्रिकेच्या क्रीडामंत्र्यांच्या या विधानानंतर क्रिकेट दक्षिण आफ्रिका (सीएसए) ने आपली भूमिका स्पष्ट केली. क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने म्हटले आहे की, 'सीएसए अफगाणिस्तानमधील महिलांच्या हक्कांची वागणूक आणि दडपशाहीला घृणास्पद मानते. तसेच महिला क्रिकेटला समान मान्यता आणि संसाधने मिळायला हवीत, असा ठाम विश्वास आहे.